# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 19 November 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १९ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- राज्यात २८८ विधानसभा मतदार संघ तसंच नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान.
- चोख सुरक्षा व्यवस्थेत सर्व साहित्यानिशी मतदान पथकं मतदान केंद्रांकडे रवाना.
- मनाई आदेश भंग प्रकरणी भाजप नेते विनोद तावडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल.

आणि

- हवामान बदलाच्या आरोग्यावर परिणामांबाबत जिल्हा आणि शहर पातळीवर कृती योजना विकसित करण्याचे केंद्राचे निर्देश.

****

राज्यात २८८ विधानसभा मतदार संघांसाठी तसंच नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. राज्यात नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार असून; एक लाख ४२७ मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदानाची वेळ असून, राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावं असं आवाहन, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. या निवडणुकीसाठी मुक्त वातावरणात, निष्पक्ष आणि शांततेत मतदान पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा देखील सज्ज आहे.

निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात ३ हजार ७७१ पुरुष, ३६३ महिला आणि २ तृतीयपंथी आहेत. बीड जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात सर्वाधिक ३४ उमेदवार रिंगणात आहेत. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ३०३

उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सर्वात कमी १७ उमेदवार सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदारसंघात १८३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत, जालना जिल्ह्यातल्या पाच मतदारसंघात १०९ उमेदवार, बीड जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघात १३९ उमेदवार, परभणी जिल्ह्यातल्या चार मतदारसंघात ५८ उमेदवार, हिंगोली जिल्ह्यातल्या तीन मतदारसंघात ५३ उमेदवार, लातूर जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघात १०६ उमेदवार, धाराशिव जिल्ह्यातल्या चार विधानसभा मतदारसंघात ६६ उमेदवार तर नांदेड जिल्ह्यातल्या नऊ मतदारसंघात १६५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत १९ उमेदवारांमधून मतदारांना आपला खासदार निवडावा लागणार आहे.

****

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदानाचा हक्क बजावण्यात महिलांपेक्षा पुरुष आघाडीवर असल्याचा सर्वसाधारण कल आहे. या निवडणुकीत सर्व मतदारांनी मतदान करण्याचं आवाहन राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केलं आहे...

**बाईट – मुख्य सचिव सुजाता सौनिक**

****

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात १२ जिल्ह्यांमधल्या ३८ मतदारसंघांत मतदान उद्या होणार असून त्यासाठी सर्व व्यवस्था पूर्ण करण्यात आली आहे. केंद्रीय निमलष्करी दलाच्या सहाशे तुकड्या संवेदनशील भागात तैनात करण्यात आल्या आहेत.

****

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात ४२६ ‘महिला नियंत्रित मतदान केंद्र’तयार करण्यात आले आहेत. या केंद्रांचे नियंत्रण महिला करणार आहेत. नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त ४५ मतदान केंद्रांचे

नियंत्रण महिलांकडे  असणार आहे. यानंतर जळगावमध्ये ३३, गोंदिया ३२ आणि सोलापूर २९, मुंबई उपनगरमध्ये २६ महिला नियंत्रित मतदान केंद्र असणार आहेत. वाशिम, सिंधुदुर्ग, गडचिरोली, हिंगोली जिल्ह्यात सर्वात कमी प्रत्येकी तीन महिला नियंत्रित मतदान केंद्र असतील.  महिला नियंत्रित मतदान केंद्रांमध्ये तैनात असलेल्या पोलिसांपासून ते निवडणूक कार्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह सर्वजण महिला असतील. लैंगिक समानता आणि मतदान प्रक्रियेत महिलांच्या अधिक रचनात्मक सहभागासंबंधातील वचनबद्धतेचा भाग म्हणून विधानसभा निवडणुकीसाठी अशी केंद्र उभारण्यात आले आहेत.

****

उद्याच्या मतदान प्रक्रियेसाठी सर्व मतदान केंद्रांवर मतदान पथकं रवाना झाली आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तीन हजार २७३ मतदान केंद्रांवरची मतदान प्रक्रिया सांभाळण्यासाठी १८ हजार १७८ अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या सर्व पथकांना आज मतदान यंत्रासह इतर आवश्यक साहित्याचं वाटप करण्यात आलं. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी या प्रक्रियेची पाहणी केली, त्यानंतर ही पथकं आपापल्या मतदान केंद्रांकडे रवाना झाली.

जालना जिल्ह्यातल्या परतूर, घनसावंगी, जालना, बदनापूर आणि भोकरदन विधानसभा मतदारसंघात उद्या सकाळी सात ते सायंकाळी सहा या वेळेत मतदान होणार आहे. पाचही मतदार संघात मिळवून एकूण एक हजार ७७५ केंद्रांवर मतदान होणार असून, निवडणूक विभागाचे कर्मचारी साहित्य घेऊन मतदान केंद्राकडे रवाना झाल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली. जालना विधानसभेसाठी एकूण ३३५ केंद्रावर मतदान होणार आहे.

बीड जिल्ह्यातील ६ मतदार संघातील २ हजार ४१६ मतदान केंद्रावर ११ हजार ४६९ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. २९९ बसच्या माध्यमातून ही पथकं आपापल्या मतदान केंद्रांवर रवाना झाली.

नांदेड जिल्ह्यात ३ हजार ८८ मतदान केंद्र आहेत. या सर्व केंद्रांवर आज सकाळी सात वाजेपासून मतदान पथक रवाना होण्यास प्रारंभ झाला.

धाराशिव जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघासाठी मतदान कर्मचारी मतदान साहित्यासह मतदान केंद्रांकडे रवाना झाले आहेत. जिल्ह्यात १ हजार ५२३ मतदान केंद्रावर १४ लक्ष ४ हजार मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

****

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता काळात १५ ऑक्टोबर ते आज पर्यंत सी-व्हिजिल ॲपवर राज्यभरातून ९ हजार २९३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ९ हजार २६५ तक्रारी निकाली काढण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, मद्य, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ६७३ कोटी २२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

****

भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याविरोधात पालघर जिल्ह्यात नालासोपारा इथल्या तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रचार संपल्यानंतर मतदार नसलेल्या राजकीय नेते तसंच कार्यकर्त्यांनी मतदार संघात थांबण्याबाबतचा मनाई आदेश भंग केल्याप्रकरणी तावडे यांच्यासह महायुतीचे उमेदवार राजन नाईक आणि सुमारे अडीचशे कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दरम्यान, बहुजन विकास आघाडी पक्षाने मात्र तावडे यांच्यावर नालासोपाऱ्यातल्या एका हॉटेलमध्ये पैसेवाटपाचा आरोप केला आहे. तावडे यांच्यासह भाजपने हे आरोप फेटाळले असून, या प्रकरणी निवडणूक आयोगाकडून चौकशी व्हावी, अशी प्रतिक्रिया तावडे यांनी दिली आहे.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, यांनी तावडे यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात रोख रक्कम भाजपाच्या लोकांकडेच कशी येते असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

****

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना हवामान बदल आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम यासाठी जिल्हा आणि शहर

पातळीवर कृती योजना विकसित करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलिला श्रीवास्तव यांनी सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव तसंच सल्लागारांना या संदर्भात पत्र पाठवलं असून या योजनांमध्ये वायू प्रदूषणाचा सामना करण्यासाठीची धोरणं समाविष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. प्रदुषणामुळे होणारे आजार आणि त्या अनुषंगाने आरोग्य प्रणाली अद्ययावत करण्यासाठीच्या शिफारसींचा या पत्रात समावेश आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जवाहर नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पैसे वाटप होत असल्याचा आरोप विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. याबाबत सामाजिक संपर्क माध्यमावर त्यांनी प्रतिक्रिया नोंदवली आहे.

****

परभणी जिल्ह्यातील चार विधानसभा मतदार संघात मतदान प्रक्रिया दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच प्रलोभनांचा  गैर वापर आणि संशयास्पद हालचालींवर करडी नजर ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन "ड्रोन पेट्रोलिंग" करत आहे. अनेक भागात, वस्तीत काही वेळा जाणं शक्य होत नाही अशा ठिकाणी ड्रोन प्रभावी मध्यम ठरत असल्याचं पोलीस अधीक्षक परदेशी यांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यात मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी १ हजार २०९ मतदान केंद्रावर थेट प्रेक्षपण होणार आहे.

****

जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये चार हजार पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. चार संवेदनशील मतदान केंद्रांसाठी सीएपीएफ पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच वेब कास्टिंग आणि मायक्रो ऑब्झर्व्हर्सद्वारे देखरेख केली जाणार आहे.

****

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव–इफ्फीला उद्यापासून गोव्यात सुरुवात होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधले एकूण १८० चित्रपट प्रदर्शित केले जातील. जागतिक चित्रपटाच्या विश्वातले आगळेवेगळे स्वर आणि नवोन्मेषशाली कथन अधोरेखित करणाऱ्या इफ्फी या महोत्सवाचं हे पंच्चावन्नावं वर्ष आहे. येत्या २८ नोव्हेंबरपर्यंत हा महोत्सव चालणार आहे

****

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जयंती आणि राष्ट्रीय एकात्मता दिवस आज सर्वत्र साजरा केला जात आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी इंदिरा गांधी यांना त्यांच्या १०७ व्या जयंती दिनानिमित्त राजभवन इथं पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. यावेळी राज्यपालांनी राजभवन येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली.

बीड इथं जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

****